

दोंडाईचा : दादासाहेब रावल प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना अक्षरा सामाजिक प्रतिष्ठानतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना मंत्री जयकुमार रावल. शेजारी मान्यवर.

# विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे गरजेचे

## मंत्री रावल : गरजू २०० विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप

**सकाळ वृत्तसेवा**

दोंडाईचा, ता. २२ : आता शिक्षणाबाबत सर्वच घटकांत जागरूकता वाढली असून, तरुणाईचे भवितव्य उज्ज्वल आहे. तथापि विद्यार्थ्यांना सर्वच क्षेत्रांत प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. यासाठी पालक, शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन रोहयो व पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

येथील स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेचा दादासाहेब रावल प्राथमिक शाळेचा विद्यार्थ्यांना मुंबईतील अक्षरा सामाजिक प्रतिष्ठानतर्फे शैक्षणिक साहित्य वाटपप्रसंगी मंत्री रावल बोलत होते. सलग दुसऱ्या वर्षी हा उपक्रम राबविला. यंदा २०० विद्यार्थ्यांना साहित्य वाटप झाले. संस्थेचे अध्यक्ष सरकारसाहेब रावल अध्यक्षस्थानी होते. मुंबईचे अक्षरा सामाजिक प्रतिष्ठानचे कार्यकारी संचालक अमोल वंजारे, उपनगराध्यक्ष रवी उपाध्ये, संस्थेचे सचिव सी. एन. राजपूत, विकासाधिकारी आर. टी. गिरासे, दोंडाईचा बाजार समिती सभापती नारायण पाटील, भाजपच्या महिला आघाडीचा जिल्हाध्यक्षा चंद्रकला सिसोदिया, नगरसेवक करणसिंह देशमुख, शिक्षण सभापती नरेंद्र कोळी, नगरसेवक निखिल जाधव आदी उपस्थित होते.

मंत्री रावल म्हणाले, की पाल्याच्या भवितव्यासाठी शिक्षकांसह पालकाची जबाबदारीही वाढली आहे. विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांना तंत्रशुद्ध शिक्षण दिले गेले पाहिजे. पालकांनीही पाल्यास वेळ देऊन त्यांना समजून त्याचे उज्ज्वल भवितव्य घडवावे.

प्रतिष्ठानचे वंजारे म्हणाले, की अक्षरा सामाजिक संस्थेमार्फत नऊ वर्षांपासून शैक्षणिक कार्य सुरू आहे. आतापर्यंत १७ हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. आगामी काळात अशीच मदत केली जाईल. मुख्याध्यापक एम. एस. सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. डी. एस. गिरासे यांनी सूत्रसंचालन केले. एम. एस. सोनवणे यांनी स्वागत केले. राजेंद्र घोडके यांनी आभार मानले.